पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

**दिनांक- ०२/०२/२०२०**

## महाराष्ट्र राज्य मानवी हक्क राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील गोपाले राज्यात दुसरे

=> मा. पोलीस महासंचालक, साो. यांच्या हस्ते प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देवुन सन्मानित

पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई यांचे व्दारे नुकत्याच राज्य स्तरावर घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य मानवी हक्क वादविवाद स्पर्धेत गडचिरोली जिल्ह्याचे पोलीस उपनिरीक्षक श्री. स्व
नील गोपाले यांनी मराठी विभागात उत्कृष्ट कामगीरी नोंदवत राज्यात दुसरे स्थान पटकाविले त्यांया या कामगरीमुळे मा. पोलीस महासंचालक श्री. सुबोध कुमार जायसवाल साो. यांच्या हस्ते रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देवुन त्यांचा गौरव करण्यात आला.

गडचिरोली परिक्षेत्र स्तरावर झालेली स्पर्धा श्री. स्वप्नील गोपाले यांनी आपल्या उत्तम वत्कृत्वाने गाजवल्या नंतर त्यांना परिक्षेत्रीय स्तरावर प्रथम क्रमांकाने सन्मानित करण्यात आले होते. या मुळे त्यांना दिनांक ०१/०२/२०२० रोजी मुंबई येथे होणाऱ्या स्पर्धेत थेट प्रवेश मिळाला होता. या ठिकाणी गडचिरोली जिल्हा पोलीस दलाचे प्रतिनिधित्व करतांना त्यांनी ' सामाजिक परंपरा मानवाधिकारास पोषक की शोषक' या विषयावर बोलतांना सामाजिक परंपरा मानवाधिकारास कशा प्रकारे शोषक आहेत या बाबतीत आपले विचार अत्यंत परखडपणे मांडले. यामुळेच सदर स्पर्धेत देखील त्यांनी यशाची परंपरा कायम राखत दुसरे स्थान मिळविले. मा. पोलीस महासंचालक साो. यांनी त्याचे विशेष कौतुक केले आहे.

त्यांया या उत्तुंग व अभिमानास्पद यशाबद्दल मा. पोलीस अधिक्षक श्री. शैलेश बलकवडे साो. यांनी गोपाले यांच्या कामगीरीचे कौतुक करत अभिनंदन केले आहे.






महाराष्ट्र पोलीस

# प्रशस्तीपत्रक

श्री./श्रीमती/कुमारी स्वप्निल गोपाले, पोलीसउप निरीक्षक
नेमणूक गडचिरोली परिक्षेत्र यांनी दिनांक ०९/०२/२०२० रोजी
घेण्यात आलेल्या राज्य स्तरीय मानवी हक्क जागृती वादविवाद स्पर्धेत
द्वितीय क्रमांक (माध्यम मराठी ) पटकाविलेला आहे.
त्यांच्या या प्रशंसनीय कामगिरीबाबत त्यांना हे प्रशस्तीपत्रक देऊन
गौरविण्यात येत आहे

(कैसर खालिद)
विशेष पोलीस महानिरीक्षक
मानवी हक्क संरक्षण
महाराष्ट्र राज्य, मुंबई

(सुबोध कुमार जायसवाल)
पोलीस महासंचालक
महाराष्ट्र राज्य, मुंबई

स्थळ : मुंबई,
दिनांक : ०९/०२/२०२०